# पू. भार्गवराम यांच्या जन्मापासूनच त्यांच्या संतत्वाची झालेली ओळख



## मनोगत

**१. 'आपत्काळात साधकांना मार्गदर्शन मिळावे आणि त्यांचे रक्षण व्हावे', यासाठी ईश्वराने सनातनला आणि सात्त्विक मानवांना दिलेले एक अपूर्व दैवी बाळ, म्हणजे जन्मतःच ७१ टक्के आध्यात्मिक पातळी, म्हणजे संत असलेला १ वर्ष ५ मासांचा पू. भार्गवराम ! :** 'आतापर्यंत आदि शंकराचार्य, संत ज्ञानेश्वर आदी बालपणीच संत असल्याची उदाहरणे आपण ऐकली आहेत. जन्मतःच संत असलेले सनातनचे पू. भार्गवराम प्रभु, हे सध्याच्या काळातील बहुधा एकमेव उदाहरण असेल ! श्रीकृष्णाच्या कृपेने चि. भार्गवराम भरत प्रभु याच्या रूपाने जनलोकातून पृथ्वीवर जन्माला आलेले पहिले बालक संतपदावर विराजमान झाल्याचा एक अपूर्व योग सनातनमध्ये पहायला मिळत आहे. या कुटुंबाचे वैशिष्ट्य म्हणजे सनातनच्या ४४ व्या संत श्रीमती पू. राधा प्रभु यांचा चि. भार्गवराम भरत प्रभु हा पणतू आहे.

**२. चि. भार्गवरामच्या गुणवैशिष्ट्यांची संगणकीय धारिका पडताळण्यासाठी उघडल्यानंतर पहिल्या काही ओळी वाचल्यानंतर लगेचच ते निराळे (अवतारी) बाळ असल्याचे जाणवणे :** ७.९.२०१८ या दिवशी प्रथमच भार्गवरामच्या गुणवैशिष्ट्यांची संगणकीय धारिका उघडल्यानंतर पहिल्या काही ओळी वाचल्यानंतर लगेचच मला 'हे निराळेच, म्हणजे अवतारी बाळ असल्याचे जाणवले.' तेव्हा मी त्याचे छायाचित्र पाहून 'त्याची आध्यात्मिक पातळी किती असावी ?', याचे सूक्ष्मातून परीक्षण केल्यावर 'जन्मतःच त्याची पातळी ७१ टक्के असून ते संत आहे आणि त्याच्यामध्ये ५ टक्के श्रीकृष्णतत्त्व आहे', हे मला समजले. आतापर्यंत मी १ सहस्रहून अधिक दैवी बालकांच्या संदर्भातील धारिका वाचल्या आहेत आणि त्यांची छायाचित्रे पाहिली आहेत; पण भार्गवरामची धारिका वाचल्यावर आणि त्याची छायाचित्रे पाहिल्यावर मनाला जितका आनंद मिळाला, तितका आनंद कधीच अनुभवला नव्हता.

अ. चि. भार्गवराम याचे एक छायाचित्र पाहून आणि त्याच्याबद्दलची

माहिती वाचून ‘त्याच्याबद्दल एक लेख लिहावा’, असे मला वाटले; म्हणून मी त्याच्या आई-वडिलांकडे त्याची छायाचित्रे आणि ध्वनीचित्रफिती मागितल्या. त्यांनी भार्गवरामची निरनिराळ्या वेळी काढलेली १०० हून अधिक छायाचित्रे आणि ध्वनीचित्रफिती पाठवल्या. (काही छायाचित्रे या ग्रंथात आणि काही छायाचित्रे ‘पू. भार्गवराम यांना ‘संत’ घोषित करण्याचा आनंददायी सोहळा’ या दुसऱ्या ग्रंथात छापली आहेत.) ती छायाचित्रे पाहून मला वाटले, ‘भार्गवराम संत असल्याचे घोषित झाल्यावर त्याची निरनिराळ्या वयांत काढलेली विविध छायाचित्रे आणि ध्वनीचित्रफिती उपयोगी पडतील’; म्हणून त्याच्या आई-वडिलांनी आधीच त्याची छायाचित्रे काढली असावीत आणि ध्वनीचित्रफिती बनवल्या असाव्यात.’

आ. चि. भार्गवराम ३ मासांचा असतांना श्रीकृष्णजन्माष्टमी दिवशी त्याची आई सौ. भवानी हिने त्याला श्रीकृष्णाचा वेश घातला होता. तसेच तो १ वर्ष ४ मासांचा असतांना श्रीकृष्णजन्माष्टमी दिवशी पू. राधा प्रभु यांच्या इच्छेनुसार त्याला श्रीकृष्णाचा वेश घातला होता.

इ. आपण श्रीकृष्णाच्या बाललीला वाचलेल्या असतात; पण त्यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला नसतो. हा ग्रंथ वाचतांना ‘आपण त्या अनुभूती स्वतः घेत आहोत’, असे आपल्याला जाणवेल.

ई. आपण अनेक संतांची चरित्रे वाचलेली असतात; पण त्यांच्या बाल्यावस्थेची आपल्याला माहिती नसते. ही माहिती या ग्रंथाद्वारे आपल्याला मिळेल. F (DW-SStBa-Bha + PR 42Ch-SStBa-Bha) (१ ते १ ई)

**३. चि. भार्गवराम यांची गुणवैशिष्ट्ये वाचल्यानंतर आलेली अनुभूती :** चि. भार्गवराम यांची गुणवैशिष्ट्ये वाचल्यानंतर आकाशात ५ मिनिटे एक गडद रंगांचे आणि एक फिकट रंगांचे अशी दोन इंद्रधनुष्ये दिसली ! ‘हीसुद्धा देवाने दिलेली एक दैवी साक्ष आहे’, असे वाटले. F (IGoBl-DvS + DW-SStBa-Bha + PR 42Ch-SStBa-Bha)

**४. या ग्रंथमालिकेतील पुढे दिलेल्या काही प्रकरणांच्या मथळ्यांवरून शिशूसंत भार्गवराम यांच्या वैशिष्ट्यांची थोडीफार कल्पना येईल.**

अ. चि. भार्गवरामच्या जन्मापूर्वी आणि जन्मानंतर त्याच्या कुटुंबियांनी अनुभवलेले त्याचे वेगळेपण !

आ. चि. भार्गवराम दैवी बालक असल्याविषयी संतांनी काढलेले उद्‌गार

इ. साधकांनी अनुभवलेले चि. भार्गवराम ! : 'बाळाचे पाय पाळण्यात दिसतात', ही म्हण प्रचलित आहे; पण हे अपूर्व दैवी बाळ पोटात असल्यापासूनच त्याच्या दैवी लीलांचा प्रत्यय त्याच्या आईला, म्हणजे सौ. भवानी प्रभु यांना आणि काही साधकांना येत होता. भार्गवरामची दैवी गुणवैशिष्ट्ये वाचतांना एक वेगळाच आनंद अनुभवायला मिळाला. त्यावरून हे निराळेच, म्हणजे 'अवतारी बाळ' असल्याचे लक्षात आले. आध्यात्मिकदृष्ट्या उन्नत असलेल्यांच्या संदर्भात इतरांना अनुभूती येतात. शिशूसंत भार्गवराम यांच्या संदर्भातही अनुभूती आल्या आहेत आणि येत आहेत. काही साधकांनी चि. भार्गवराम यांची जाणवलेली गुणवैशिष्ट्ये त्यांचे संतत्व घोषित होण्यापूर्वीच लिहून दिली आहेत. त्यात त्यांनी पू. भार्गवराम यांचा एकेरी उल्लेख केला आहे. काही साधकांनी चि. भार्गवराम यांना संत घोषित केल्यानंतर त्यांना पूर्वी चि. भार्गवराम यांची आठवलेली गुणवैशिष्ट्ये लिहून दिली आहेत. त्यात त्यांनी पू. भार्गवराम यांचा आदरार्थी उल्लेख केला आहे. त्यामुळे पू. भार्गवराम यांचा काही ठिकाणी एकेरी, तर काही ठिकाणी आदरार्थी उल्लेख केलेला आढळतो. पू. भार्गवराम यांचे संतत्व प्रकट करणारा सन्मान सोहळा, त्या वेळी साधकांना आलेल्या अनुभूती इत्यादी लिखाण 'पू. भार्गवराम यांना 'संत' घोषित करण्याचा आनंददायी सोहळा' या दुसऱ्या खंडात दिले आहे आणि त्यांच्या भावी कार्याची ओळख दुसऱ्या खंडाच्या 'मनोगता'त दिली आहे.

**५. प्रभु आणि पडियार कुटुंबीय अन् पू. भार्गवराम यांच्या प्रती कृतज्ञता ! :** श्री. भरत आणि भवानी यांच्यासह त्या दोन्ही कुटुंबांतील सर्वजण पूर्णवेळ साधना करणारे आहेत. त्यांनी सर्वस्वाचा त्यागही केला आहे. यावरूनही ‘संत कोणत्या कुटुंबात जन्माला येतात’, हेही लक्षात येते. असे अपूर्व दैवी बाळ जन्माला घातल्याबद्दल प्रभु आणि पडियार कुटुंबियांचे आभार मानावे तेवढे थोडे !’

**– (परात्पर गुरु) डॉ. आठवले (७.९.२०१८)** F (DW-SStBa-Bha + PR 42Ch-SStBa-Bha) (४ ते ५)


हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी

**सनातन प्रभात**

DainikSanatanPrabhat.blogspot.com

- **दैनिक** (मराठी - ४ आवृत्त्या)
- **साप्ताहिक** (मराठी आणि कन्नड)
- **पाक्षिक** (हिंदी, इंग्रजी)

(जा. क्र. ८८०३)



कृण्वन्तो विश्वमार्यम् ।

आध्यात्मिक संशोधन आणि हिंदु धर्मप्रसार यांसाठी

**महर्षि अध्यात्म विश्वविद्यालय**

अवश्य भेट द्या : **Spiritual.University**

Advt No. 1256

सुसंस्कारित आणि आदर्श पिढी घडवणारे

**Balsanskar.com**

मराठी, हिंदी, कन्नड अन् इंग्रजी भाषांत !



- बोधप्रद गोष्टी
- तेजोमय इतिहास
- अभ्यासाची पद्धत
- स्तोत्रे अन् आरत्या

ऑस्ट्रेलियास्थित ‘एस्.एस्.आर.एफ्.’ या संस्थेचे संकेतस्थळ

**www.SSRF.org**

हिंदी, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन आदी २२ भाषांत !



आतापर्यंत जगभरातील ५.०९ कोटी वाचकांच्या भेटी !

Advt

# अनुक्रमणिका

१. संत कुटुंबाच्या घरी पू. भार्गवराम यांना जन्माला घालण्यामागे परात्पर गुरु डॉ. आठवले यांचे जाणवलेले द्रष्टेपण १८

२. संतबालके ओळखणारे सध्याच्या काळातील एकमेव परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले ! २९

३. पू. भार्गवराम यांच्या आईचे विवाहापूर्वीचे नाव 'प्रतीक्षा' असणे आणि परात्पर गुरु पांडे महाराज यांची भेट झाल्यावर त्यांनी 'तू ज्याची प्रतीक्षा करत आहेस, ते तुला मिळू दे', असे सांगणे ३१

४. चि. भार्गवराम दैवी बालक असल्याविषयी संतांनी काढलेले उद्‌गार ३१

५. चि. भार्गवराम यांची एस्.एस्.आर्.एफ्.च्या साधिका सौ. योया वाले यांना जाणवलेली सूक्ष्मातील वैशिष्ट्ये ३४

६. चि. भार्गवराम यांच्या जन्मापूर्वी आणि जन्मानंतर त्यांच्या कुटुंबियांनी अनुभवलेले त्यांचे वेगळेपण ३८

७. साधकांनी अनुभवलेले चि. भार्गवराम ! ५४

८. विज्ञानानेही सिद्ध केले पू. भार्गवराम यांचे संतत्व ! ५९

९. चि. भार्गवराम यांच्या कुंडलीचे ज्योतिषशास्त्रानुसार 'ज्योतिष फलित विषारद' सौ. प्राजक्ता जोशी यांनी केलेले विश्लेषण ६५

१०. पू. भार्गवराम यांच्या संदर्भातील ग्रंथांसाठी त्यांच्या छायाचित्रांची रंगीत पाने सिद्ध करतांना कला-विभागातील साधकांना आलेल्या अनुभूती ७१

**सनातनच्या नवीन ग्रंथांविषयी जाणून घेण्यासाठी संपर्क करा –**

**prasarsahitya@gmail.com** किंवा **भ्रमणभाष : ९३२२३१५३१७**

'सनातन'चे ग्रंथ 'ऑनलाइन' खरेदीसाठी उपलब्ध – **www.SanatanShop.com**